# सागरा प्राण तळमळला

## कवि :– प्रभाकर वि. बोपर्डीकर, पी. ई. न्यूयॉर्क

## ( अर्थात बंडूचें परदेश -- गमन गीत. )

( स्वा. सावरकरांच्या गीताचे विडंबन )

तीन–चार वेळा ' पुनरागमनायच ' करून कसा बसा एस. एस. सी. झाल्यावरहि बंडूला मुंबईत नोकरी मिळणें मुष्किल होत होते, कॉलेजमध्ये प्रवेश मिळायलाहि हजार अडचणी ! घरी आई बाबा ' कार्टया काही तरी कर ' असे सारखे ओरडत. तेव्हा ह्या सर्वांच्या जाचाने आता कसे ही करून यु. एस्. ए. लाच जायचे असे बंडूच्या मनाने पक्के घेतले.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनीहि इंग्लंड टु भारत येण्यासाठी सागराची मध्यस्थी मान्य करून त्याची विनवणी केली. त्याला शपथ घातली शेवटी धाक घातला या सर्व प्रकाराची बंडूला आठवण झाली. विमनस्कपणें दादर चौपाटीवर सागरी लाटांचे खेळ पहात वाळूत पडला असताना बंडूने तसेच गीत रचले! तेच हे ' बंडूचे परदेश गमन ' गीत !

यू. एस्. ए. – ( म्हणजे उल्हासनगर सिंधी असोसिएशन नसून येथे युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका असा अर्थ घ्यावा ! ) बद्दल माहिती गोळा करत असताना कल्पनेनेच तो जणू तिकडे फिरू लागला.

तिथल्या कॉलेजमधील तरुण तरूणींची एकत्र रहाण्याची वसति–गृहे हॉलीवुडची रम्य दृष्ये वगैरे.

आणि प्रत्यक्षात जाण्यात बऱ्याच अडचणी येत होत्या. मित्रांच्या पत्रांचा स्पॉन्सर म्हणून व्हिसाला उपयोग होतो की नाही ? टॅक्स भरून त्याचे पूर्ण असे सर्टिफिकेट पासपोर्ट ऑफिसर मानतो की नाही ? प्रवास एजंट भाडे कमिशन वगैरे कटकट करतो, ( ब्याद टळावी म्हणून आईने फक्त एकवेळचे तिकडे जाण्याचे भाडे ही आनंदाने द्यायचे कबूल केले. ही गोष्ट निराळी ! ) आणि पुनः तो खाजगी रीत्या डॉलरचा भाव १२ रु. आहे हेही सुनावतो वगैरे. ह्या अनेक अडचणींमुळे परदेश गमन बारगळले तर काय ? मुम्बईत नोकरीचा प्रश्न, शिक्षणाचा प्रश्न, बाहेर गाली, मद्रासी, पंजाबी यांच्या गलबल्यात गरीब महाराष्ट्रीयनाचे कोण ऐकतो हा धसका ! त्यामुळे येन केन प्रकरण जायला पाहिजेच ह्या पिंजऱ्यातून बाहेर पडायला पाहिजेच हे त्याने आपल्या मनाला पटवून दिले.

नें मजसी ने त्वरित यू. एस्स. अे. ला
सागरा प्राण तळमळला–सागरा
प्राण तळमळला सागरा ऽ ऽ

धनिकांना तू यू. एस. ए. ला नेता
मी नित्य पाहिला होता.
मज वदलासी तुजही नेईन आता
जरी नसे वशिला मोठा
तै जननीहृद आनंदितही झाले
' कधि टळतोस ! ' असेही पुशिले
जाण्याचे तिकिटही ती देता
परतण्याची नको तिज चिंता
विश्वसलो इति तव वचनी मी–
येईन कसा सोडूनी यू. एस्स. ए. ला?
सागरा प्राण तळमळला,
सागरा ऽ ऽ :१:

घरी बाबांच्या–वा गाडीत चेकरापाशी
ही फसगत झाली तैशी
हे दिवस कसे सतत साहूं या पुढती
दश–दिशा तमोमय होती.
पत्र–मैत्री मी जोडियली या भावे
कीं, तिने इथूनी न्यावे.
जरी व्हिशाला उपयोग नसे हो
त्याचा
हा व्यर्थ खर्च पोष्टाचा

'बस–स्टॉप' ची ती मन्रो रे
'नायगऱ्या' शी मज भेटे रे
'मियामी' ची विश्वसुंदरी रे
हॉली–वूड मला हाय पारखे झाले
सागरा प्राण तळमळला.

सागरा ऽ ऽ :२:

जगी भाषा रे, बहुत होत–परी प्यारी
मज आंग्ल भूमीची बोली.
कॉलेज इथे रुईया–वाडिया भाऊ
परि जाणेंची मज ओहियो, आयडाहो
पुरड्यू
क्लासेस इथेही खूप
परि नकोत मज ते–
ढाके, देशपांडे, दिक्षित.
डॉक्ट्रेट नको मुंबई–कलकत्त्याची
'को–ब्रेड' डॉर्म हवी परि 'कॅन्सस्'ची
सिनसिनाटीवीण नको प्रवेश मज रे
साचा,
जरी मिळे घरपोंच पंवईचा.
बंगाली स्वयंभू बाबू रे,
मद्रासी उंडू–गुंडू रे,
पंजाबी इथ्ये किथ्ये लाला रे,
बहु अधिरे गमते चित्ता रे,
तुज 'बीच'–पते जी 'बेदिंग–ब्यूटी' रे
तद् विरहाची शपथ घालितो तुजला
सागरा प्राण तळमळला,

सागरा ऽ ऽ :३:

बुद्धि–पलायनाचे ☆ भयही नसता
नोकरी मिळतही नसता
टॅक्सचे सर्टिफिकेटही असता
पासपोर्ट साठी अर्ज मी करीतही असता
कां अडथळे आणिसी ऐसा ?
पोल्युशनची नसे मज पर्वा रे
डॉलरची नसे मज चिंता रे
कमिशनची नसे अभिलाषा रे
स्पर्धक जो अति–वेगवान तुज रे,
त्या बोईंगला हाय–जॅकीन मी आता
सागरा प्राण तळमळला
सागरा प्राण तळमळला.

ने मजसी ते त्वरित यू. एस्स. ए. ला
सागरा प्राण तळमळला
सागरा ऽ ऽ

:४:

० ० ०

---

☆ बुद्धि पलायन: – म्हणजेच ब्रेन ड्रेन. बंडूची बुद्धि ती काय, ब्रेन ते काय आणि त्यातून ड्रेन ते काय होणार ?